'समाजकल्याण अधिकारी, गट ब' चाळणी परीक्षा - २०१२

A

2012

Code : **W01**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET No. **124053**

# प्रश्नपुस्तिका

## चाळणी परीक्षा/SCREENING TEST

वेळ : $1\frac{1}{2}$ (दीड) तास

एकूण प्रश्न : 150

एकूण गुण : 150

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 150 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा–क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा–क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम–82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

कच्च्या कामासाठी जागा

1. सन 1857 चा उठाव उत्तर भारतात मोठ्या प्रमाणावर झाला. तसा मुंबई किंवा मध्य प्रांत वऱ्हाडात कां झाला नाही ?

अ) दुसऱ्या बाजीरावाच्या मनमानी कारभारामुळे अनेक जण दुखावले होते.

ब) स्वराज्याविषयी जनतेत आत्मीयता राहिली नव्हती.

क) परत पेशव्यांचे राज्य येईल ही भिती होती.

ड) उठावात एकसूत्रीपणा नव्हता.

(1) अ) फक्त (2) अ), ब) आणि क)

(3) अ) आणि ड) (4) अ), ब), क) आणि ड)

---

2. श्री शंकर प्रासादिक सोमवंशीय हितचिंतक मित्र समाज व सोमवंशीय मित्र हे वृत्तपत्र कोणी सुरू केले ?

अ) शिवराम जानबा कांबळे

ब) गोपाळबुवा वलंगकर

क) किसन फागू बनसोडे

ड) गणेश आकाजी गवई

(1) अ) फक्त (2) अ) आणि ब)

(3) ब) आणि ड) (4) ड) फक्त

---

3. खालीलपैकी कोणता इंग्रज अधिकारी 1857 च्या घटनेमध्ये सहभागी नव्हता ?

(1) लॉरेन्स (2) कॅनिंग

(3) वेलस्ली (4) हॅवलॉक

---

4. कामगारांची दयनीय परिस्थिती सुधारावी व त्यांना कायद्याचे संरक्षण मिळावे याकरिता सर्व प्रथम कोणी प्रयत्न केला ?

(1) नारायण मेघाजी लोखंडे (2) सोरावजी शापूरजी बंगाली

(3) रसिकलाल घोष (4) फामजी मानेकजी

---

5. खालीलपैकी कोणास 'भारतीय कामगार चळवळीचे' जनक म्हणतात ?

(1) ना. म. जोशी (2) श्रीपाद डांगे

(3) भाऊ फाटक (4) नारायण लोखंडे

---

**कच्च्या कामासाठी जागा**

6. तात्या टोपे यांना फाशी देण्यात आलेले ठिकाण कोणते ?

(1) काल्पी (2) शिप्री

(3) झांसी (4) ग्वाल्हेर

7. खालीलपैकी कोणते विधान बिनचूक आहे ?

अ) महाराष्ट्रात औष्णिक वीज उत्पादन जास्त होते.

ब) महाराष्ट्रात नैसर्गिक वायुपासून सर्वाधिक वीजेचे उत्पादन होते.

क) महाराष्ट्रात पाण्याद्वारे वीजेचे उत्पादन जास्त होते.

ड) महाराष्ट्रात अक्षय ऊर्जा निर्मितीचे प्रमाण जास्त आहे.

(1) फक्त अ)

(2) फक्त क)

(3) अ) आणि ब)

(4) क) आणि ड)

8. पूर्व किनाऱ्याच्या तुलनेने पश्चिम किनाऱ्यावर चांगली बंदरे आहेत याचे सर्वात महत्त्वाचे व प्रमुख कारण ________

अ) पश्चिम किनाऱ्यावर अधिक चांगला व्यापार चालतो.

ब) पश्चिम किनाऱ्यावरून जगातील सर्व देश सागरी मार्गाने जोडलेले आहेत.

क) पश्चिम किनाऱ्यावर वाहतूकीच्या सर्व प्रकारच्या सुविधा आहेत.

ड) पश्चिम किनारा अधिक खोल व दंतूर आहे.

(1) फक्त क) (2) फक्त ड)

(3) अ) आणि ब) (4) ब) आणि क)

9. महाराष्ट्रातील मागील 50 वर्षाचा कालावधी लक्षात घेता असे आढळते की प्रत्येक दशकात भुईमूग या पिकाचे उत्पादन घटलेले आहे त्यासाठी खालीलपैकी सर्वात प्रमुख कारण कोणते ?

(1) प्रत्येक दशकात जमिनीची सुपिकता कमी झाली आहे.

(2) प्रत्येक दशकात महाराष्ट्रातील पर्जन्यमान अतिशय अपुरे आहे.

(3) प्रत्येक दशकात लागवडीचे क्षेत्र घटत गेलेले आहे.

(4) प्रत्येक दशकात उच्च प्रतीच्या बियाणांची कमतरता आहे.

कच्च्या कामासाठी जागा

**10.** भारतीय बेटे देशाला महत्त्वाची आहेत याचे प्रमुख कारण ____________

अ) येथे मोठ्या प्रमाणावर मासेमारी चालते.

ब) बेटे पर्यटकांची आकर्षण स्थळे आहेत.

क) बेटांचा उपयोग नाविक दलास होतो.

ड) बेटे भारताच्या सागरी सीमा व संरक्षणाच्या दृष्टिने उपयोगी पडतात.

(1) फक्त ड) (2) फक्त ब)

(3) अ) आणि ब) (4) ब) आणि क)

---

**11.** खालीलपैकी कोणते विधान मुंबई शहरासाठी लागु पडत नाही ?

(1) भारताची आर्थिक राजधानी

(2) भारतातील सर्वात मोठे औद्योगिक केंद्र

(3) सात बेटांचे शहर

(4) महाराष्ट्रातील सर्वात जास्त लोकसंख्येचा जिल्हा

---

**12.** खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे ?

अ) नर्मदा व तापी नदीच्या दरम्यान सातपुडा पर्वत आहे.

ब) नर्मदा व तापी नदीच्या दरम्यान अजिंठा डोंगर रांगा आहेत.

क) गोदावरी व भीमा नदीच्या दरम्यान सातमाळा डोंगर रांगा आहेत.

ड) गोदावरी व भीमा नदीच्या दरम्यान शंभू महादेव डोंगर रांगा आहेत.

(1) फक्त अ) (2) फक्त क)

(3) ब) आणि क) (4) क) आणि ड)

---

**13.** जिल्हा न्यायाधिशांची नेमणूक राज्यपाल ____________ च्या सल्ल्याने करतात.

(1) महाअधिवक्ता

(2) मुख्यमंत्री

(3) उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश

(4) कायदेमंत्री

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**14.** महाराष्ट्रात शिवसेनेची स्थापना ________ साली करण्यात आली.

(1) 1885 (2) 1947 (3) 1966 (4) 1985

---

**15.** महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम 1960 मधील कोणत्या भागात जमीन सुधार आकार याविषयीची तरतूद आहे ?

(1) विभाग 2 (2) विभाग 4
(3) विभाग 5 (4) विभाग 7

---

**16.** भारताच्या वार्षिक अंदाजपत्रकातील सार्वजनिक महामंडळांचे हिशोब तपासण्याचे काम संसदेची कोणती समीती करते ?

(1) अंदाज समीती (2) लोकलेखा समीती
(3) प्रवर समीती (4) यापैकी नाही

---

**17.** न्यायालयीन पुनर्विलोकनाचे तत्त्व भारतीय राज्यघटनेत कोणत्या देशापासून स्विकारण्यात आले ?

(1) चीन (2) इंग्लंड
(3) फ्रान्स (4) अमेरीका

---

**18.** भारतीय राज्यघटनेच्या खालीलपैकी कोणत्या कलमामध्ये जम्मू-काश्मिर या राज्याला देशातील अन्य राज्यांपेक्षा विशिष्ट दर्जा दिल्याचे नमूद केले आहे ?

(1) 360 (2) 370
(3) 380 (4) 390

---

**19.** सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश वयाची ________ वर्षे पूर्ण झाल्यावर निवृत्त होतात.

(1) 65 (2) 60 (3) 58 (4) 62

---

**20.** भारतीय राज्यघटनेत केंद्र सूचीमध्ये किती विषय समाविष्ट आहेत ?

(1) 77 (2) 47 (3) 97 (4) 67

---

**21.** प्रकाशीय तंतूचे (ऑप्टीकल फायबर) कार्य कोणत्या तत्त्वाने चालते ?

(1) संपूर्ण अंतर्गत अपवर्तन (2) संपूर्ण अंतर्गत विकिरण
(3) संपूर्ण अंतर्गत अपस्करण (4) संपूर्ण अंतर्गत परिवर्तन

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**22.** राष्ट्रीय एड्स संशोधन संस्था (नारी) कोठे आहे ?

(1) पाटणा (2) पुणे
(3) दिल्ली (4) नागपूर

**23.** खालीलपैकी कोणता पदार्थ कीटक नाशक नाही ?

(1) डी डी टी (2) पोटॅश ॲलम
(3) एन्ड्रीन (4) फॉलीडॉल

**24.** जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| 1) दुर्बिण | 1) गिल्बर्ट |
| 2) सूर्यकेंद्री सिद्धांत | 2) गॅलिलिओ |
| 3) चुंबकत्वाचा सिद्धांत | 3) विल्यम हार्वे |
| 4) रूधिराभिसरण सिद्धांत | 4) कोपर्निकस |

(1) 1 – 1 2 – 2 3 – 3 4 – 4
(2) 1 – 2 2 – 4 3 – 1 4 – 3
(3) 1 – 2 2 – 1 3 – 4 4 – 3
(4) 1 – 1 2 – 3 3 – 2 4 – 4

**25.** भारतातील पहिले दूरदर्शन केंद्र कोठे सुरू झाले ?

(1) दिल्ली (2) मुंबई
(3) चेन्नई (4) कोलकत्ता

**26.** महाराष्ट्राच्या कोणत्या शहरात उपग्रह दूरनियंत्रण केंद्र नियोजित आहे ?

(1) नागपूर (2) पुणे
(3) शेगांव (4) मुंबई

**27.** धुम्रपानामुळे कोणत्या अवयवाचा कॅन्सर होतो ?

(1) यकृत (2) फुफ्फुस
(3) तोंडाचा (4) आतड्यांचा

**कच्च्या कामासाठी जागा**

**28.** मानवी रक्त गटाचा शोध कोणी लावला ?

(1) मेकेंझी
(2) थॉमस हंट मार्गन
(3) अलेक्झांडर फ्लेमींग
(4) कार्ल लॉडस्टायवर

**29.** पश्चिमीकरणातील महत्त्वाचा गुणधर्म म्हणजे

(1) राष्ट्रहितवाद
(2) मानवहितवाद
(3) जमातवाद
(4) समाजवाद

**30.** खालीलपैकी कोणत्या बाबी केंद्रकीय संम्मीलनावर आधारीत आहेत ?

अ) सूर्यप्रकाशाची निर्मिती
ब) अणूबॉम्ब
क) हायड्रोजन बॉम्ब
ड) विद्युत निर्मिती

(1) अ) आणि ब)
(2) अ) आणि क)
(3) ब), क) आणि ड)
(4) अ), क) आणि ड)

**31.** सुदूर संवेदन उपग्रह कोणत्या कक्षेत भ्रमण करतात ?

(1) वर्तुळाकार व ध्रुवीय
(2) अंडाकृती व विषुववृत्तीय
(3) वर्तुळाकार व विषुववृत्तीय
(4) अंडाकृती व ध्रुवीय

**32.** भूस्थिर कक्षेत फिरणाऱ्या उपग्रहाला पृथ्वीभोवती एक फेरी पूर्ण करण्यासाठी किती कालावधी लागतो ?

(1) 24 तास
(2) 7 दिवस
(3) एक महिना
(4) एक वर्ष

**कच्च्या कामासाठी जागा**

**33.** पुढे दिलेल्या विधानापैकी सत्य विधाने ओळखा.

A) उपचार हे रोगनिदानापूर्वी करावे लागतात.

B) इंटरफेरॉन हे जीवाणूंना मारतात.

C) पोलिओची लस बनविताना अशक्त केलेले पोलिओ विषाणू वापरतात.

D) जनुकीय पारेषित बटाटे खाण्यापूर्वी ते चांगले उकडावे लागतात.

E) PKU हा एक प्रकारचा अनुवंशिक आजार आहे.

(1) C), E) (2) A), D)

(3) B), E) (4) A), B)

---

**34.** आधुनिकीकरणाची गती आणि दिशा कशी असते ?

(1) अधोमुख (2) सरळ

(3) वर्तुळाकार (4) ऊर्ध्वमुख

---

**35.** अमोनिया वायू हवेच्या अध:सरण पद्धतीने गोळा करतात कारण तो ________

(1) हवेपेक्षा जड आहे (2) पाण्यात विरघळतो

(3) आम्लारिधर्मी आहे (4) हवेपेक्षा हलका आहे

---

**36.** खालीलपैकी कोणती पद्धत संशोधनासाठी सर्वात चांगली पद्धत आहे ?

(1) निगमन (2) अभ्युपगमात्मक निगमन

(3) निरीक्षणात्मक निगमन (4) यापैकी नाही

---

**37.** $\alpha, \beta, \gamma$ या किरणांच्या धातूच्या पत्र्यातून आरपार जाण्याच्या क्षमतेनुसार क्रमसंबंध ओळखा.

(1) $\gamma > \beta > \alpha$ (2) $\alpha > \beta > \gamma$

(3) $\beta > \alpha > \gamma$ (4) $\alpha > \gamma > \beta$

---

**38.** बिग बँग थिअरी कशाशी संबंधीत आहे ?

(1) विश्वाची निर्मिती (2) जीवसृष्टीची निर्मिती

(3) सजीवांची उत्क्रांती (4) पृथ्वीची निर्मिती

---

**कच्च्या कामासाठी जागा**

39. मूळ वस्तूच्या हुबेहुब प्रतिकृतीस काय म्हणतात ?

(1) होलोग्राफ (2) होमीओमार्फ

(3) होलोग्राम (4) पॉलीग्राफ

40. विषासंबंधीचा अभ्यास विज्ञानाच्या कोणत्या शाखेत केला जातो ?

(1) व्हायरोलॉजी (2) ऑर्निथॉलॉजी

(3) टॉक्सिकॉलॉजी (4) ऑप्थॉल्मॉलॉजी

41. योजना काळात भारत सरकारच्या करेत्तर महसूलाची कोणती प्रवृत्ती दिसून येते ?

(1) स्थिर (2) घटती (3) वाढती (4) ऋणात्मक

42. भारतातील विभागीय ग्रामीण बँकांच्या तोट्याची कारणे कोणती ?

अ) असंख्य खातेदारांच्या, खाते हाताळण्याचा खर्च जास्त आहे.

ब) सवलतीच्या व्याजदरात कर्ज देण्याचे धोरण.

क) ग्रामीण भागातून जमा होणाऱ्या ठेवीचे प्रमाण कमी आहे.

ड) थकबाकीचे प्रमाण वाढत आहे.

(1) अ) आणि ब) (2) अ), ब), क)

(3) वरील सर्व (4) वरीलपैकी कोणतेही नाही

43. पुढील विधानाचा परिणाम काय होईल ते सांगा. सर्वसाधारण कर आकारणीमुळे किंमत पातळीवरील परिणाम

अ) ज्या कर आकारणीत प्रत्यक्ष करांचे प्रमाण अधिक असते, त्या कर आकारणीमुळे किंमत पातळी स्थिर ठेवण्यास मदत होते.

ब) ज्या कर आकारणीत अप्रत्यक्ष करांचे प्रमाण अधिक असते, अशा कर आकारणीमुळे किंमत पातळी वाढत जाते.

क) कर आकारणीमुळे किंमत पातळीवर कोणताही परिणाम होत नाही.

(1) अ) आणि ब) (2) फक्त क)

(3) वरीलपैकी सर्व (4) वरीलपैकी कोणताही नाही

**कच्च्या कामासाठी जागा**

**44.** खालील तक्त्यात वर्ष व भारताच्या निर्यातीचे प्रमाण दाखविले आहे. त्यावरून योग्य जोडी जुळवा

| **वर्ष** | **भारताच्या एकूण निर्यातीपैकी विशिष्ट देशातील निर्यातीचे प्रमाण** | **a)** | **b)** | **c)** |
|---|---|---|---|---|
| अ) 1950-51 | इंग्लंड | 2.8 | 26.8 | 11.7 |
| ब) 2010-11 | यू.एस.ए. | 10.0 | 18.6 | 16.8 |
| | ऑस्ट्रेलिया | 0.6 | 6.6 | 1.7 |
| | रशिया | 6.0 | 1.0 | 12.5 |

(1) अ) = b), ब) = a)
(2) अ) = a), ब) = c)
(3) ब) = b), अ) = c)
(4) वरील कोणताही पर्याय योग्य नाही

---

**45.** भारतातील व्यापारी बँकांच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान/विधाने खरे/खरी ठरते/ठरतात ?

अ) मार्च 1950 अखेर व्यापारी बँकांची संख्या 545 व त्यांच्या शाखांची संख्या 4,055 होती.

ब) जून 1969 मध्ये व्यापारी बँकांची संख्या 156 व त्यांच्या शाखांची संख्या 8,226 होती.

क) मार्च 2010 अखेर व्यापारी बँकांची संख्या 169 व त्यांच्या शाखांची संख्या 85,393 होती.

ड) मार्च 2011 अखेर व्यापारी बँकांची संख्या 110 व त्यांच्या शाखांची संख्या 32,624 होती.

(1) फक्त ड)
(2) अ), ब), क)
(3) वरील सर्व
(4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

**46.** भारतातील आयात-निर्यात करा-संबंधी खालीलपैकी कोणते वाक्य/वाक्ये बरोबर आहे/आहेत ?

(1) सुमारे 99% उत्पन्न आयातीवरील कराद्वारे मिळते.
(2) निर्यातीवरील कराद्वारे सरकारला फार मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळते.
(3) निर्यात कराद्वारे मिळणारे तुलनात्मक उत्पन्न हे आयातीवरील कराद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा जास्त आहे.
(4) वरीलपैकी कोणतेही नाही.

---

**47.** राज्य सरकारची अर्थ संकल्पीय तूट खालीलपैकी कोणत्या कारणाने कमी करता येत नाही, त्यावर मर्यादा आहेत.

(1) राज्य सरकारचे उत्पन्न वाढवून
(2) राज्य सरकारचे खर्च कमी करून
(3) केंद्र सरकार कडून कर्ज घेऊन
(4) परकीय कर्ज घेऊन

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**48.** राजकोषीय (Fiscal Policy) धोरणाचा संबंध कशाशी असतो ?

अ) कर आकारणी

ब) सार्वजनिक कर्ज

क) सार्वजनिक खर्च

ड) सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन

इ) पत नियंत्रण

(1) फक्त ब) आणि क)  (2) अ), ब), क), ड)

(3) फक्त ड) आणि इ)  (4) इ), ड), क), अ)

---

**49.** ग्रामीण कर्ज पुरवठ्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका कोणत्या दोन घटकामधील दुवा आहेत ?

(1) शेतकरी व सरकार

(2) व्यापारी व दलाल

(3) प्राथमिक सहकारी संस्था व राज्य सहकारी बँका

(4) व्यापारी बँका व भारतीय रिझर्व बँक

---

**50.** योग्य जोडी जुळवा :

| **X गट (वर्ष)** | **Y गट (शेकडा प्रमाण)** <br> **भारताच्या एकूण निर्यातीत शेती क्षेत्राचा वाटा** |
|---|---|
| अ) 1960-61 | a) 50% |
| ब) 2006-07 | b) 44.2% |
| | c) 10.3% |
| | d) 8.0% |

(1) अ) : a), ब) : b)  (2) अ) : b), ब) : c)

(3) अ) : c), ब) : a)  (4) अ) : d), ब) : b)

---

**कच्च्या कामासाठी जागा**

51. पुढील 'अ' गट व 'ब' गट यातील विधानांची योग्य जोडी जुळवा.

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| A) मध्यवर्ती बँक | c) बँक नियंत्रण व विकासात्मक कार्य करणे |
| B) व्यापारी बँक | d) खातेदारांच्या ठेवी घेणे व त्यांना कर्ज देणे |
| | e) शेवटचा आश्रयदाता म्हणून कार्य करणे |
| | f) अग्रणी बँक योजना राबविणे |
| | g) सरकारची बँक म्हणून कार्य करणे |
| | h) पत निर्मिती करणे |

(1) A) : c), d), e)
B) : f), g), h)

(2) A) : f), g), h)
B) : c), d), e)

(3) A) : d), f), h)
B) : c), e), g)

(4) A) : c), e), g)
B) : d), f), h)

52. दारिद्र्य निर्मूलनाच्या कोणत्या योजनेनुसार भारतात गरीब लोकांना 2 रु. प्रति किलो गहू व 3 रु. प्रति किलो तांदूळ उपलब्ध करून दिला जातो ?

(1) अन्नपूर्ण योजना
(2) अंत्योदय योजना
(3) माध्यान्ह भोजन योजना
(4) जवाहर रोजगार योजना

53. मागील पाच वर्षाच्या काळात, भारतातील भाववाढीच्या संदर्भात कोणते/कोणती विधान/विधाने खरे/खरी ठरते/ठरतात ?

अ) पूर्वीपेक्षा घाऊक किंमत निर्देशांकाचा पाया विस्तृत करण्यात आला आहे.
ब) औद्योगिक कामगारांचा उपभोग किंमत निर्देशांक तुलनात्मकदृष्ट्या कमी वाढ दर्शवितो.
क) कृषी कामगारांचा उपभोग किंमत निर्देशांक तुलनात्मकदृष्ट्या जास्त वाढ दर्शवितो.
ड) औद्योगिक कामगारापेक्षा कृषी कामगारावर भाववाढीचा जास्त प्रतिकूल परिणाम झाला आहे.

(1) फक्त ड)
(2) अ), ब), क)
(3) ब), क), ड)
(4) वरील सर्व

कच्च्या कामासाठी जागा

**54.** भारताच्या विदेशी व्यापाराशी निगडीत खालील विधाने विचारात घ्या.

अ) नियोजन काळामध्ये भारताच्या निर्यात मूल्यामध्ये व आयात मूल्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

ब) नियोजन काळामध्ये व्यापारातील तुटीमध्ये वाढ झाली आहे.

क) नियोजन काळामध्ये विदेशी व्यापाराची दिशा संकुचित झाली आहे.

वरीलपैकी कोणते विधान/विधाने सत्य आहे/आहेत ?

(1) फक्त अ)

(2) फक्त अ) आणि ब)

(3) वरील सर्व

(4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

**55.** सन 2009-10 च्या आर्थिक वर्षासंदर्भात पुढील विधाने विचारात घ्या.

अ) केंद्र सरकारची महसूली तूट GDP च्या 5% होती.

ब) अन्न, खते व निर्यात अनुदाने यासाठी अनुदानासाठी केंद्र सरकारने GDP च्या 1.9% खर्च केला.

क) सदर वर्षी सार्वजनिक खर्चाचे प्रमाण GDP च्या 29% होते.

ड) केंद्र सरकारच्या एकूण महसूली उत्पन्नापैकी कर उत्पन्न 70% होते.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

(1) अ), ब), क)
(2) ब), क), ड)
(3) अ), क), ड)
(4) वरील सर्व

---

**56.** गेल्या 10 वर्षाच्या काळातील भारताच्या विदेशी व्यापाराच्या संदर्भात पुढील विधाने विचारात घ्या.

अ) भारताचे आयातमूल्य हे निर्यात मुल्यापेक्षा सतत जास्त राहिले आहे.

ब) आयात मुल्यामध्ये अन्नधान्याच्या आयातीवर मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो.

क) भारताच्या आयात व निर्यातीच्या मूल्यात सतत घट होत आहे.

ड) शेती आधारित वस्तु व शेतीजन्य औद्योगिक कच्चा माल यांची निर्यात घटत आहे.

वरीलपैकी कोणते/कोणती विधान/विधाने खरी ठरतात ?

(1) अ) आणि ड)
(2) ब) आणि क)
(3) अ), ब), ड)
(4) वरील सर्व विधाने

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**57.** सार्क-SAARC – संघटनेचे सभासद देश कोणते ?

अ) भारत, रशिया, चीन, जपान, भूतान, मॅनमार

ब) भारत, द. आफ्रिका, इस्त्राईल, यू. एस. ए., अफगाणीस्तान

क) इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, डेन्मार्क

ड) बांगळादेश, भूतान, नेपाळ, श्रीलंका, मालदीव, पाकिस्तान व भारत

(1) अ) (2) ड) (3) क) (4) ब)

---

**58.** खालीलपैकी कोणत्या उपायामुळे भाववाढ कमी होण्याऐवजी त्यात वाढ घडून येईल ?

(1) चलनाचा पुरवठा कमी करणे

(2) चलनाचा पुरवठा वाढविणे

(3) वित्तीय तूट कमी करणे

(4) वस्तु व सेवेचा पुरवठा वाढविणे

---

**59.** कॅगच्या लेखा परीक्षणात खालीलपैकी कशाचा समावेश नसतो ?

(1) रेल्वे

(2) सरंक्षण क्षेत्र

(3) सरकारचे येणे

(4) खाजगी क्षेत्राचे लेखा परीक्षण

---

**60.** कॅगच्या कार्यक्षमता लेखा परीक्षणा संदर्भात खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(1) सरकारी योजनेने कमीत कमी खर्चात ध्येय साध्य केले की नाही ते तपासणे

(2) खर्च करण्याचा अधिकार तपासणे

(3) नियम व कायद्याचे पालन झाले की नाही तपासणे

(4) सक्षम अधिकाऱ्याने खर्च मान्य केले की नाही तपासणे

---

**61.** यु.जी.सी. ने समाज कार्य शिक्षणांसाठी तिसरी आढावा समिती (Third Review Committee) कोणत्या साली स्थापन केली ?

(1) 2000 (2) 2001

(3) 2002 (4) 2003

---

कच्च्या कामासाठी जागा

**62.** व्यावसायिक समाज कार्यकर्त्यांची ''नीतीमुल्ये'' टाटा सामाजिक विज्ञान संस्थेने (TISS मुंबई) कोणत्या साली तयार केली ?

(1) 1995 (2) 1996 (3) 1997 (4) 1998

---

**63.** जोड्या लावा :

अ) कोनोप्का — I) सोशल डायग्नॉसीस

ब) मेरी रिचमंड — II) कम्युनिटी-ऑर्गनायझेशन

क) मुरे रॉस — III) ग्रुप वर्क इन चिल्ड्रेन इंस्टिट्युशन

ड) पॉलन यंग — IV) सायंटिफिक सोशल सर्व्हे ॲण्ड रिसर्च

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | II | III | IV | I |
| (2) | IV | III | II | I |
| (3) | III | I | II | IV |
| (4) | I | III | IV | II |

---

**64.** समाजकार्य व्यक्ती स्वातंत्र्य व त्याच्या ________ यावर विश्वास ठेवते.

(1) ज्ञान (2) अज्ञान

(3) कृतीशील क्षमता (4) शक्ती

---

**65.** खालीलपैकी सामाजिक कृतीचे तंत्र कोणते ?

(1) मौन धारण करणे

(2) रणनीतिनुसार कायदेशीर लढा

(3) राजकीय पक्ष स्थापन करणे

(4) अफवा पसरविणे

---

**66.** बालगुन्हेगारीची वाढ होण्यात कोणता घटक कारणीभूत आहे ?

(1) शिक्षण (2) कुटुंब (3) आई (4) वडिल

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**67.** मानवी अपव्यापार प्रतिबंध आणि जबरी श्रम व शोषण विरोधात भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदात तरतूद केली आहे ?

(1) अनुच्छेद 17
(2) अनुच्छेद 23
(3) अनुच्छेद 24
(4) अनुच्छेद 45

---

**68.** बाल विवाह प्रतिबंधक कायदा खालीलपैकी कोणत्या साली पारित करण्यात आला ?

(1) 1929
(2) 1948
(3) 1961
(4) वरीलपैकी कोणत्याही नाही

---

**69.** महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेचे जनक खालीलपैकी कोणास मानले जाते ?

(1) यशवंतरावजी चव्हाण
(2) वसंतराव नाईक
(3) वि.स. पागे
(4) बाळासाहेब भारदे

---

**70.** सेल्डन बेकनच्या मते मद्यपान ही ______________ आहे.

(1) सवय
(2) गरज
(3) देणगी
(4) व्याधी

---

**71.** समाजकल्याण प्रशासनाच्या कार्याला अभिव्यक्त करण्यासाठी POSTCORB हे सूत्र कोणी दिले ?

(1) टालकोट पार्सन
(2) लूथर मलिक
(3) लियोनार्ड मलिक
(4) एच्. बी. ट्रेकर

---

**72.** नागरी हक्क संरक्षण कायदा, 1955 नुसार खालीलपैकी कोणास संरक्षक तरतुदी लागू होतात ?

(1) अल्पसंख्यांक जातीची व्यक्ती
(2) अनुसूचित जमातीची व्यक्ती
(3) अनुसूचित जातीची व्यक्ती
(4) वरीलपैकी 2 व 3

---

**कच्च्या कामासाठी जागा**

73. समाजकल्याण प्रशासन म्हणजे विशिष्ट व्यावसायिक कौशल्ये वापरून __________ रूपांतर सामाजिक कृतीत करणे होय.

(1) शासकीय योजनेचे
(2) स्वयंसेवी संस्थाच्या योजनेचे
(3) खाजगी योजनेचे
(4) सामाजिक धोरणाचे

74. समाजकल्याण प्रशासनाचे तत्त्वज्ञान कशावर आधारीत आहे ?

(1) मानवतावाद
(2) संपत्तीविषयक स्वातंत्र्य व सुरक्षितता
(3) आदर्शवाद
(4) निर्हस्तक्षेपाचा सिद्धान्त

75. भारतात प्रथम कोठे 1922 मध्ये बाल न्यायालय सुरू करण्यात आले ?

(1) मुंबई
(2) दिल्ली
(3) कलकत्ता
(4) चेन्नई

76. खालीलपैकी प्रामुख्याने माणसाचे व्यक्तिमत्त्व कोण घडवितो ?

(1) सवयी
(2) परिवेश
(3) वर्तन
(4) स्वभाव

77. व्यक्ति समाजात कसे जीवन जगेल याची निश्चिती कोण करते ?

(1) मित्र
(2) कुटुंब
(3) संस्था
(4) वरीलपैकी कोणीही नाही

78. व्यक्तिमत्त्वात व्यक्तिचे __________ याचा अंतर्भाव असतो.

(1) सामाजिक संबंध
(2) नाते संबंध
(3) धर्म व जात
(4) विचार-भावना

79. ऑलपोर्टच्या नवीन सुधारित व्याख्येनुसार व्यक्तिचे वैशिष्ट्यपूर्ण वर्तन व विचार निर्धारीत करणारे, तिच्या अंतर्गत असणारे __________ संस्थांचे गतीशील संघटन म्हणजे व्यक्तिमत्त्व होय.

(1) मानसिक
(2) बौद्धिक
(3) शारीरिक
(4) मानसजैविक

कच्च्या कामासाठी जागा

**80.** विचार, कल्पनाशक्ती, स्मरण, एकात्मता व सामान्यीकरण यांच्या विकासासाठी खालीलपैकी कोणती शब्दयोजना केली जाते ?

(1) शारीरिक विकास
(2) भावनात्मक विकास
(3) बौद्धिक विकास
(4) नैतिक विकास

---

**81.** आधुनिक काळात ______________ सामाजिक संकट मानले जाते.

(1) औद्योगिकरणास
(2) शहरीकरणास
(3) बेकारीस
(4) नोकरशाहीस

---

**82.** समाज कार्यातील स्त्रीवादाशी खालीलपैकी कोणती गोष्ट जुळत नाही ?

(1) समान अधिकाराचा पुरस्कार
(2) निर्णय प्रक्रियेत स्त्रीयांचा सहभाग
(3) आत्मशोधातून स्त्रीयांचे सबळीकरण
(4) जागतिकीकरणातून एकजिनसी समाजाची निर्मिती

---

**83.** रामकृष्ण मिशनची स्थापना खालीलपैकी कोणी केली ?

(1) द्वारकानाथ टागोर
(2) देवेंद्रनाथ टागोर
(3) केशबचंद्र सेन
(4) स्वामी विवेकानंद

---

**84.** प्रत्येक समाजाला __________ असतात/असते.

(1) बंधने
(2) नियम
(3) समाज रचना
(4) ओळख

---

**85.** म. गांधीजींच्या मते ___________ हा निधर्मी व समानतेचा संदेश देणारा आहे.

(1) सर्वोदय
(2) ग्राम स्वराज्य
(3) अहिंसा
(4) वरीलपैकी कोणताही पर्याय योग्य नाही

---

कच्च्या कामासाठी जागा

**86.** भारतात कोणत्या सालापासून सामुदायिक विकास कार्यक्रम सुरू करण्यात आला ?

(1) 1952
(2) 1957
(3) 1978
(4) वरीलपैकी कोणत्याही नाही

**87.** आधुनिक समाज शास्त्र व सामाजिक मानसशास्त्राच्या विकासात भरीव योगदान आपल्या ''स्व आणि समाज'' (self and society) या सिध्दांताद्वारे देणारे समाज शास्त्रज्ञ कोणते ?

(1) चार्लस् हॉर्टन कुले
(2) मॅक्स वेबर
(3) इमिल डुर्कहेम
(4) हर्बर्ट स्पेन्सर

**88.** मानव हा समाजशील प्राणी आहे (Man is a Social Animal) असे खालीलपैकी कोणी म्हटले ?

(1) रूसो
(2) कार्ल मार्क्स
(3) ॲरिस्टॉटल
(4) किंग्जले डेव्हिस

**89.** गटांचे प्राथमिक गट व दुय्यम गट असे वर्गीकरण खालीलपैकी कोणी केले ?

(1) किंग्सले डेव्हिस
(2) चार्लस् हॉर्टन कुले
(3) मॅक्स वेबर
(4) श्रीमती सुधा काळदाते

**90.** मॅक्स वेबर यांनी प्राधिकार (Authority) च्या प्रकारात खालीलपैकी कशाचा अंतर्भाव केलेला नाही ?

(1) विवेक व कायदेशीर प्राधिकार
(2) पारंपरिक प्राधिकार
(3) नियमबाह्य प्राधिकार
(4) करिश्मा प्राधिकार

**91.** कर्मचारी राज्य विमा कायदा (ESI Act) किती साली अस्तित्वात आला ?

(1) 1947 (2) 1950 (3) 1949 (4) 1948

**92.** राज्य कामगार विमा कायदा 1948 नुसार कामगारांना आरोग्य विमा व__________ फायदे मिळतात.

(1) पदोन्नतीचे
(2) सामाजिक
(3) वैद्यकीय
(4) नोकरीचे

**93.** भारतातील पंचायतीराजची सुरुवात कोणत्या समितीच्या शिफारशीनुसार झाली ?

(1) पी. बी. पाटील समिति
(2) मुदलियार समिती
(3) बलवंतराय मेहता समिती
(4) वरीलपैकी कोणत्याही नाही

**कच्च्या कामासाठी जागा**

**94.** अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, 1989 नुसार महाराष्ट्रात शिक्षा ठोठाविले जाण्याचे प्रमाण खालीलपैकी किती टक्के आहे ?

(1) 50% पेक्षा अधिक
(2) 20 ते 30% पर्यंत
(3) 10 ते 20%
(4) 10% पेक्षा कमी

**95.** भारतीय सुधार शाळा कायदा कोणत्या साली पारित करण्यात आला ?

(1) 1897
(2) 1881
(3) 1930
(4) वरीलपैकी कोणत्याही नाही

**96.** शारीरिक परिवर्तन, आत्मचेतना, काम चेतनेत वाढ, आदर्शवाद विरुद्ध वास्तवतावाद, समवयस्क संबंध इ. खालीलपैकी मानवी विकासाचा कोणता टप्पा अधोरेखित करतात ?

(1) बाल्यावस्था
(2) किशोरावस्था
(3) प्रौढावस्था
(4) वरील 1, 2 व 3

**97.** केंद्रिय समाजकल्याण मंडळ ______________ साली स्थापन झाले.

(1) 1953
(2) 1947
(3) 1948
(4) 1950

**98.** समाजसेवी संस्थामध्ये जनसंपर्काचा सर्वात मोठा फायदा कोणता ?

(1) संस्थेच्या अडचणी सोडविणे
(2) संस्थेमधील वाद मिटविणे
(3) सकारात्मक जनमत तयार होणे
(4) संस्थेमध्ये चांगले सेवक भरती करणे

**99.** समाजसेवी संस्थांची यशाची किल्ली कोणती ?

(1) आर्थिक संपत्ती
(2) समुदायाचा परिणामकारक आराखडा असणे
(3) सभा घेणे
(4) कार्यक्रम घेणे

**100.** भारत सेवक समाजाची स्थापना नामदार गोखले यांनी कोणत्या साली केली ?

(1) 1919
(2) 1905
(3) 1906
(4) 1904

कच्च्या कामासाठी जागा

**101.** राष्ट्रीय समाज कार्यकर्त्यांची संघटना (NASW) किती साली प्रस्थापित झाली ?

(1) 1954 (2) 1955

(3) 1956 (4) 1957

**102.** ''इंडियन जर्नल ऑफ सोशल वर्क'' हे मासिक कोणत्या संस्थेने सुरू केले ?

(1) निर्मला निकेतन, मुंबई

(2) कर्वे सामाजिक संस्था, पुणे

(3) समाज कार्य विभाग, लखनौ विद्यापीठ, लखनौ

(4) टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई

**103.** समाज कार्य हे कायदेशीर प्रवाहात किती सालापासून सामील झाले ?

(1) 1968 (2) 1969 (3) 1971 (4) 1970

**104.** माणसाचे व्यक्तिमत्त्व घडविण्याचे व त्याचे समाजीकरण करण्याची महत्त्वाची जबाबदारी कोणावर असते ?

(1) प्रवास (2) पुस्तके

(3) व्यक्तिसंबंध (4) कुटुंब

**105.** बुद्धिचे सामाजिक बुद्धि, अमूर्त बुद्धि आणि मूर्त बुद्धि असे प्रकार खालीलपैकी कोणी मांडले ?

(1) ई. एल. थॉर्नडाइक (2) गार्डनर

(3) रेमंड कॅटेल (4) स्टेन बर्ग

**106.** हिलरी मँटेल या लेखिकेस अलीकडे (2012) कोणता पुरस्कार प्राप्त झाला ?

(1) बुकर (2) नोबेल

(3) पुलित्झर (4) कॉमनवेल्थ

**107.** प्रख्यात मराठी लेखक भालचंद्र नेमाडे कोणत्या विचारधारेचे प्रतिनिधित्व करतात ?

(1) प्रादेशिकतावाद (2) हिंदुत्ववाद

(3) देशीवाद (4) स्वच्छंदतावाद

**कच्च्या कामासाठी जागा**

**108.** भारतीय राष्ट्रीय उपग्रह प्रणाली (इन्सॅट मालिका) ही बहुउद्देशीय उपग्रह प्रणाली असून तिचा उपयोग कशाकरिता केला जातो ?

अ) दूरसंचार

ब) हवामान अंदाज

क) आकाशवाणी-दूरदर्शनचे राष्ट्रव्यापी प्रसारण

ड) नैसर्गिक आपत्तींची पूर्वसूचना

(1) अ) आणि ब) (2) ब) आणि क)

(3) क) आणि ड) (4) वरील सर्व

---

**109.** 20 व्या कायदा आयोगाचा कालावधी काय आहे ?

(1) 1 एप्रिल 2012 ते 31 मार्च 2015

(2) 1 जून 2012 ते 31 मे 2015

(3) 1 सप्टेंबर 2012 ते 31 ऑगस्ट 2015

(4) 1 जानेवारी 2013 ते 31 डिसेंबर 2015

---

**110.** 'ऑक्युपाय'' या आंतरराष्ट्रीय सामाजिक चळवळीचा रोख कोणत्या समस्येवर आहे ?

(1) असमानता (2) मूलतत्त्ववाद

(3) वंशवाद (4) नववसाहतवाद

---

**111.** कोणत्या समस्येशी संबंधित जनआंदोलनातून अलीकडे भारतात एका नव्या पक्षाची स्थापना झाली आहे ?

(1) दहशतवाद (2) भूसंपादन

(3) नक्षलवाद (4) भ्रष्टाचार

---

**112.** आफ्रिका खंडात गुंतवणूक करणारा आघाडीचा आशियाई देश कोणता ?

(1) भारत (2) जपान

(3) चीन (4) इंडोनेशिया

---

**113.** पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचे अध्यक्ष कोण आहेत ?

(1) एम्. गोविंद राव (2) सौमित्र चौधरी

(3) सी. रंगराजन् (4) व्ही. एस्. व्यास

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**114.** कोणत्या ग्रहावर बर्फाचे साठे असल्याचा निश्चित पुरावा गत वर्षी उपलब्ध झाला आहे ?

(1) बुध (2) गुरु

(3) मंगळ (4) शुक्र

**115.** इंधनाचा पर्यायी स्त्रोत म्हणून कोणत्या वनस्पतीची मोठ्या प्रमाणात लागवड करण्यात येत आहे ?

(1) जट्रोपा (Jatropa) (2) स्ट्रॉबेरी

(3) लिच्ची (4) पेअर

**116.** कोणत्या कंपनीच्या भागीदारास बीटी कापूस बियाणे विकण्यास सरकारने प्रतिबंध केला आहे ?

(1) ड्यूपाँट (2) मोन्सान्टो

(3) सिंजेंटा (4) बेयर

**117.** लंडन येथे 2012 मध्ये आयोजिलेल्या ऑलिंपिक क्रिडास्पर्धेत मेरी कोम यांनी कोणते पदक प्राप्त केले ?

(1) कांस्य (2) सुवर्ण

(3) रजत (4) यापैकी नाही

**118.** जगातील प्रौढ व्यक्तींमध्ये निरक्षरतेचे प्रमाण किती आहे ?

(1) 7% (2) 17%

(3) 27% (4) 37%

**119.** 2011 ते 2020 हे दशक संयुक्त राष्ट्र संघटनेने कोणत्या उद्दिष्टासाठी मुक्रर केले आहे ?

(1) वसाहतवादाचे निर्मूलन

(2) स्त्री-पुरुष समानता

(3) एच आय व्ही-एडस्‌चे निर्मूलन

(4) वांशिक समता

**कच्च्या कामासाठी जागा**

**120.** 'आधार' योजने विषयीचे कोणते विधान सत्य आहे ?

(1) ती केवळ भारतीय नागरिकांसाठी आहे

(2) भारतातील सर्व रहिवासी त्यासाठी सशर्त पात्र आहेत

(3) ती केवळ प्रौढ व्यक्तींसाठी आहे

(4) ती शासनमान्य संस्थांना मिळू शकेल

---

**121.** 2012 च्या पूर्वार्धात सर्वाधिक तीव्रतेचा भूकंप कोठे घडला ?

(1) जपान (2) चीन

(3) फिलिपीन्स् (4) इंडोनेशिया

---

**122.** बाळासाहेब ठाकरे यांनी 1960 मध्ये मराठीतील पहिले व्यंग्यचित्र साप्ताहिक सुरू केले त्यास 'मार्मिक' हे नाव खालीलपैकी कोणी सुचविले ?

(1) आर. के. लक्ष्मण (2) आचार्य अत्रे

(3) प्रमोद नवलकर (4) प्रबोधनकार ठाकरे

---

**123.** 'पुढच्या दोन वर्षात महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला नाही तर मला फाशी द्या' असे जाहीररित्या कोणी सांगितले होते ?

(1) यशवंतराव चव्हाण

(2) सुधाकरराव नाईक

(3) वसंतराव नाईक

(4) शंकरराव चव्हाण

---

**124.** 'प्रहार' नावाच्या डीआरडीओ ने विकसित केलेल्या क्षेपणास्त्राची चाचणी वर्ष 2011 मध्ये घेण्यात आली ते क्षेपणास्त्र कसे आहे ?

(1) लघु पल्ल्याचे जमिनीवरून हवेत मारा करणारे

(2) दीर्घ पल्ल्याचे जमिनीवरून हवेत मारा करणारे

(3) लघु पल्ल्याचे जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे

(4) दीर्घ पल्ल्याचे जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे

---

कच्च्या कामासाठी जागा

**125.** ''सत्यशोधक'' हे बहुचर्चित नाटक कोणी लिहिले आहे ?

(1) गो.पु. देशपांडे (2) जोतिबा फुले

(3) राजीव नाईक (4) धर्मकीर्ती सुमंत

**126.** एक डॉक्टर एका गंभीर रुग्णाची तपासणी प्रथम 8.30 वाजता करतात, नंतर 9.20 वाजता करतात, तिसऱ्या वेळी 10.30 वाजता व चौथ्या वेळेस 12.00 वाजता करतात. या हिशोबाने नंतरची तपासणी ते केंव्हा करतील ?

(1) 12.30 (2) 1.20

(3) 1.30 (4) 1.50

**127.** वांग्याला टोमेटो म्हटले, टोमेटोला भेंडी म्हटले, भेंडीला कारले म्हटले, कारल्याला गाजर म्हटले तर भेंडीच्या भाजीसाठी कशाचा वापर करावा ?

(1) गाजर (2) कारले


(3) टोमेटो (4) भेंडी

**128.** राहूल हा दक्षिणेकडे 6 कि.मी. पळत गेला. तेथून ईशान्येकडे वळून 10 कि.मी. पळाला आणि डाविकडे वळून 8 कि.मी. चालत गेला तर तो मूळ ठिकाणाहून किती अंतरावर आहे ?

(1) 0 कि.मी. (2) 6 कि.मी.

(3) 8 कि.मी. (4) 10 कि.मी.

**129.** जर ABJH, JDEF, ACEG, हे चौरस आहेत $\frac{BC}{AB} = 3$ तर $\frac{\text{क्षेत्रफळ BCDJ}}{\text{क्षेत्रफळ HJFG}} = ?$




(1) $\frac{1}{9}$ (2) $\frac{1}{3}$

(3) 1 (4) 3

कच्च्या कामासाठी जागा

**130.** पुढील संख्यापैकी कोणती संख्या संपूर्ण वर्गसंख्या आहे ?

(1) 1.6 (2) 0.016

(3) 0.16 (4) 1.60

---

**131.** 'A' हा 'B' पेक्षा हुशार आहे. 'C' हा 'A' पेक्षा हुशार आहे. 'D' हा 'C' पेक्षा हुशार आहे. 'E' हा सर्वात हुशार आहे. तर हुशारीच्या क्रमाने मध्यभागी कोण येईल ?

(1) D (2) A

(3) B (4) C

---


**132.** एका आयताकृती जागेच्या प्रत्येक कोपऱ्यावर एक मुलगी उभी आहे, रूंदीच्या बाजूवर एक मुलगी, एक मुलगा, पुन्हा एक मुलगी, एक मुलगा अशी मुले उभी आहेत. लांबीच्या बाजूवर दोन मुलींमध्ये दोन मुले असा क्रम आहे, तर आयताकृती जागेवर एकूण कितीजण उभे आहेत ?

(1) 20 (2) 21

(3) 22 (4) 23

---

**133.** खालील आकृत्यांपैकी एक आकृती तीन आकृत्यांच्या गटात बसत नाही. ती आकृती ओळखा.




(1) (2) (3) (4)

(1) आकृती (1)

(2) आकृती (2)


(3) आकृती (3)


(4) आकृती (4)


---


कच्च्या कामासाठी जागा


**134.** डावीकडे दिलेल्या आकृतीसमोर आरसा धरला असता तिची प्रतिमा कशी दिसेल ते त्यापुढे दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा.





(1) 


(2) 


(3) 


(4) 


**135.** प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य पर्याय लिहा.




(1) 82

(2) 59

(3) 56

(4) 63

कच्च्या कामासाठी जागा

**136.** $(99)^{\circ} \times (999)^{\circ} \times (9999)^{\circ} = ?$

(1) 0 (2) 1 (3) 2 (4) 3

**137.** **विधान** - सर्व स्वीच प्लग आहेत.
काही प्लग्ज बल्ब आहेत.
सर्व बल्ब होल्डर्स आहेत.
**निष्कर्ष** - i) काही होल्डर्स प्लग आहेत.
ii) काही प्लग्ज स्वीच आहेत.

(1) निष्कर्ष 'i' सत्य

(2) निष्कर्ष 'ii' सत्य

(3) निष्कर्ष 'i' आणि 'ii' दोन्ही सत्य


(4) निष्कर्ष 'i' किंवा 'ii' दोन्ही असत्य

**138.** माझ्या शाळेच्या पूर्वेला बँक आहे. माझे घर शाळेच्या दक्षिणेला आहे. बँकेच्या उत्तरेला मार्केट आहे. जर मार्केट ते बँक यामधील अंतराइतकेच अंतर माझे घर ते शाळा यामध्ये असेल तर शाळेच्या कोणत्या दिशेला मार्केट असेल ?

(1) नैऋत्य (2) ईशान्य

(3) आग्नेय (4) वायव्य

**139.** अंकमालिकेतील अंक ओळखा.




(1) 190 (2) 255 (3) 221 (4) 236

**140.** दिलेल्या पर्यायामधून योग्य 'अंकाचा' पर्याय शोधा.
7 , 9, 13, 21, ?

(1) 35 (2) 37 (3) 39 (4) 31


**कच्च्या कामासाठी जागा**


**141.** आजपासून आठ वर्षांनी मोनिकाचे वय तिच्या 6 वर्षा पूर्वीच्या वयाच्या दुप्पट होईल. तर तिचे आजचे वय काय ?


(1) 4 (2) 8 (3) 12 (4) 20


---


**142.** प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य आकृती निवडा.



(1) 

(2) 

(3) 

(4) 


---

**143.** विसंगत पर्याय ओळखा.
पृथ्वी, गुरु, शुक्र, मंगळ


(1) पृथ्वी (2) गुरु (3) शुक्र (4) मंगळ


---

**144.** झाडे, गवत व वनस्पती यांतील संबंध कोणत्या आकृतीच्या साहाय्याने दर्शविता येईल ?

(1) 

(2) 

(3) 

(4) 

---


**145.** एका वर्गात 160 विद्यार्थी आहेत त्यापैकी 110 ग्रामीण विद्यार्थी आहेत. त्यापैकी 5% मुली आहेत. तसेच वर्गात 34 शहरी मुली आहेत तर वर्गात एकूण किती टक्के शहरी मुले आहेत ?

(1) 50 (2) 10 (3) 64 (4) 32

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**146.** खाली दिलेल्या आकृतीत एकूण किती त्रिकोण आहेत ?



(1) 18 (2) 36 (3) 54 (4) 50

---

**147.** एका सांकेतिक लिपीत POND हा शब्द POPDPN असा लिहितात, NAME हा शब्द NANENM असा लिहितात, तर त्याच लिपीत KICK हा शब्द कसा लिहाल ?

(1) KIKCKK (2) KIKKKC

(3) KIKCCK (4) KIKCKC


---

**148.** जर एका घड्याळात चार वाजता चार टोले पडण्यास 12 सेकंद लागतात तर, त्याच घड्याळात आठ वाजण्याचे टोले पडण्यास किती वेळ लागेल ?

(1) 28 सेकंद (2) 16 सेकंद (3) 20 सेकंद (4) 24 सेकंद

---

**149.** एक घन सहा रंगांनी रंगवल्यास विविध बाजूंनी पाहिल्यावर खालीलप्रमाणे दिसतो तर निळ्या रंगाच्या विरुद्ध बाजूला कोणता रंग असेल ?




(1) पिवळा (2) लाल (3) गुलाबी (4) पांढरा

---

**150.** 80 विद्यार्थ्यांपैकी 55 विद्यार्थी इंग्रजीत पास झाले आणि 65 विद्यार्थी गणितात पास झाले तर, दोन्ही विषयात किती विद्यार्थी पास झाले ?

(1) 25 (2) 30 (3) 35 (4) 40

---

**कच्च्या कामासाठी जागा**

## सूचना – (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत: बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग – 1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

### नमुना प्रश्न

प्र. क्र. **201.** आधुनिक विचारसरणीनुसार शिक्षणाच्या प्रक्रियेतील केंद्रबिंदु कोण ?

(1) शिक्षण संस्था (2) शिक्षक

(3) विद्यार्थी (4) अभ्यासक्रम

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर ''(3) विद्यार्थी'' असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर ''(3)'' होईल. यास्तव **खालीलप्रमाणे** प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक ''③'' हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र.क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा**

SEAL